पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८
कामगार कल्याण विभाग
जा.क्र. काक/३/कावि/१६०/२०२२
दिनांक - २५/१०/२०२२

प्रति,
मा. सर्व विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

विषय :- १. कंत्राटी कामगारांचे किमान वेतन दराबाबत

संदर्भ :- १. मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्रमांक- काक/३/कावि/९४/२०२२ दिनांक- १२/०२/२०२२

२. मा. कामगार उप आयुक्त (ग्रा. वि) मुंबई व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम१९४८ यांचेकडील क.ग्रा.वि/कि. वे.अ/वि/२०२२(२) कार्या- १०/२१८३६ दिनांक ०१/०८/२०२२ रोजीने भत्याचे निर्धारित केलेले दर.

३. जा.क्र.काक/३/कावि/१०८/२०२२ दिनांक - ०४/०८/२०२२

४. मा. अतिरिक्त आयुक्त सो यांचेकडील परिपत्रक क्र. काक/३/कावि/१५९/२०२२ दिनांक- २५/१०/२०२२

महोदय,

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भिय क्र. १ चे आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कामगारांचे तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणा-या कंत्राटी कामगारामार्फत नेमणेत आलेल्या कंत्राटी कामगारांचे दिनांक ०१/०१/२०२२ पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित आले आहे. सदर आदेशामध्ये दर सहा महिन्याकरिता प्रसिद्ध होणा-या विशेष भत्याने दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावे व त्याचप्रमाणे संबंधित विभागांनी किमान वेतनदराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे. उक्त संदर्भीय क्र.२ अन्वये दिनांक. ०१/०७/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ या कालावधीतील विशेष भत्याचे दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदरचे दर संदर्भिय क्र.३ अन्वये प्रसिद्ध करणेत आले आहे. किमान वेतन दरानुसार ज्या कर्मचा-यांचे एकूण वेतन र.रु २१,०००/- (अक्षरी र.रु एकवीस हजार फक्त) पेक्षा जास्त आहे त्यांना माहे ऑक्टोबर २०२२ पासून ई.एस.आय लागू नसलेबाबत संदर्भिय क्र. ४ चे परिपत्रकान्वये कळविले आहे. त्यानुसार दिनांक. ०१/१०/२०२२ ते दिनांक ३१/१२/२०२२ या कालावधीतील दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासु,

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**कामगार कल्याण विभाग**
कुशल / अर्धकुशल / अकुशल कामगारांचे किमान वेतन दर खालीलप्रमाणे
(कालावधी - दिनांक ०१/१०/२०२२ ते ३१/१२/२०२२)
मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/९४/२०२० दिनांक १२/०२/२०२० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून
मा. अति. आयुक्त (१) सो यांचेकडील परिपत्रक क्र. काक/३/कावि/१५९/२०२०
दिनांक २५/१०/२०२० नुसार
जा.क्र. काक/३/कावि/१६०/२०२२ दिनांक २५/१०/२०२२ चे लगत

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मूळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. (१ + २) |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ७,०७०.०० | २१,०७०.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ७,०७०.०० | २०,०७०.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ७,०७०.०० | १८,५७०.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रीत रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय राहतील

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (१ + २ यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ. (एकूण वेतन र.रु.१५,०००/- पर्यंतच देय) | १३% |
| ३ | बोनस (१ + २ यावर) | ८.३३% |
| ४ | रजा वेतन (१ + २) यावर | ५.७७% |
| ५ | कामगार कल्याण निधी (दरमहा) | र. रु. ६/- |
| ६ | सेवा शुल्क (१ + २ यावर) अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५% |

ज्या कंत्राटी कामगारांना गणवेश देण्यात येतो त्या कामगारांना धुलाई भत्ता र. रु. १००/- देय राहील.

वरीलप्रमाणे मनपातील सर्व कंत्राटी कामगारांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

(प्रमोद जगताप)
**कामगार कल्याण अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८